# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

ई-मेल आयडी-11thonlineadmissiondydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिद्धी निवेदन दिनांक :०४/०७/२०१७

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११वी सन २०१७-१८ ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. या प्रवेश प्रक्रियेकरिता शासनाने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश अर्ज भाग-१ व भाग-२ पूर्ण करण्याची अंतिम मुदत दि.२९ जून २०१७ सायं.०४:०० वा. देण्यात आलेली होती, त्यानुसार विद्यार्थ्यांनी भाग-१ व भाग-२ पुर्ण केलेले आहेत.

या वेळापत्रकानुसार दि. ०४ जुलै २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती तपासण्यासाठी जनरल मेरिट लिस्ट जाहीर झालेली आहे. या यादीतील माहितीनुसार विद्यार्थ्यांच्या अर्जात काही त्रुटी असल्यास **(उदा-आरक्षणाबाबत बदल, नावांत बदल, जन्म तारखेत बदल, मार्क्स मध्ये बदल इ.) त्या त्रुटी दुरुस्ती करण्यासाठी दिनांक ०५ व ०६ जुलै २०१७** रोजी वेबसाईट वरील हॉम पेजवर नोटीफीकेशनमध्ये उपलब्ध असलेला हरकती / त्रुटीचा अर्ज डाऊनलोड करून प्रिंट घेऊन माहिती भरून विद्यार्थ्यांनी दि. ०५ व ०६ जुलै २०१७ रोजी सकाळी ११ ते ४.०० या वेळेत जवळच्या मार्गदर्शन केंद्रावर त्रुटी /हरकती बाबत आवश्यक कागदपत्रासह अर्ज मार्गदर्शन केंद्रावर जमा करावा.

**सदर माहिती /त्रुटी पाहण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.**

१) विद्यार्थ्यांने इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या pune. 11thadmission.net या संकेतस्थळावर जावून तेथे उपलब्ध असलेल्या नोटीफीकेशन ( Notification) मध्ये दिलेल्या (Check Merit List) लिंक वर (Click) करावे. त्यानंतर दिसणा-या (Merit List) यापेजवर दिसणा-या बॉक्स मध्ये आपला फॉर्म क्रमांक टाकून त्या शेजारच्या (Search) बटनावर (Click) करावे.

२) त्यानंतर (Rank Card) या नावाचे पेज दिसेल, यामध्ये विद्यार्थ्याची सर्व माहिती तपासण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर माहितीची विद्यार्थी प्रिन्ट घेऊ शकतात.

३) विद्यार्थ्यांने आपली माहिती तपासून बरोबर असल्याची खात्री करावी. माहिती बरोबर नसल्यास अथवा कोणत्याही माहिती मध्ये दुरुस्ती करावयाची असल्यास विद्यार्थ्यांने आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे किंवा बाहेरच्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केंद्रावर जावुन हरकतीचा/त्रुटीचा अर्ज भरुन करावयाच्या दुरुस्तीच्या पुराव्यासह मुख्याध्यापक/मार्गदर्शन केंद्रावर जमा करावा.

मार्गदर्शन केंद्रांनी / शाळेच्या मुख्याध्यापकांनी आलेल्या अर्जांची तपासणी करुन योग्य पुराव्याच्या आधारे विद्यार्थी/पालक यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती मध्ये योग्य ती दुरुस्ती आपणास दिलेल्या मुख्याध्यापक लॉग-इन किंवा मार्गदर्शन केंद्राच्या लॉग-इन मधून दिनांक ०५ व ०६ जुलै २०१७ रोजी सकाळी ११.०० ते दु. ४.०० या वेळेत करावयाची आहे.

४) एसएससी बोर्डा व्यतिरिक्त अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या मार्क्स मध्ये केवळ श्रेणीचे मार्क्स नोंदविलेले आहेत, सदरचे श्रेणीचे रुपांतर मार्कांमध्ये करणे आवश्यक आहे अशा विद्यार्थ्यांनी अन्य बोर्डासाठी दिलेल्या मार्गदर्शन केंद्रावर जाऊन आपली कन्व्हरटेड मार्कलिस्ट दाखवुन मार्कांमध्ये योग्य ती दुरुस्ती करुन घ्यावी. फक्त श्रेणी नोंदविलेल्या विद्यार्थ्यांचा पहिल्या गुणवत्ता यादीसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या मार्कात यापुर्वी नोंदविलेल्या मार्कांमध्ये काही बदल झालेला असल्यास व बोर्डाचे अधिकृत पत्र मिळालेले असल्यास अशा विद्यार्थ्यांनी **शिक्षण उपसंचालक कार्यालय, लाल देवळासमोर, कॅम्प पुणे-१ येथील श्री. जगताप के.जी. यांचेकडे** आवश्यक कागदपत्रासह अर्ज दयावा.

६) विद्यार्थ्याने/पालकाने आपला हरकती अर्ज दिलेल्या दिनांकादिवशी व वेळेत मार्गदर्शन केंद्रावर जमा करावा वेळेनंतर आलेल्या हरकती अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**(विशेष सूचना :- एटीकेटी (ATKT) व तसेच जुलै २०१७ पुर्नपरीक्षेत उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांसाठी निकालानंतर प्रवेश प्रक्रियेच्या फे-यांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल).**

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक, पुणे

# हरकती अथवा त्रुटी बाबतचा अर्ज

**इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१७-१८**

| |
|---|
| आवक क्र:- |
| दिनांक :- /०७ /२०१७ |
| (फक्त कार्यालयीन कामकाजासाठी |

प्रति,

मा.अध्यक्ष,
केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती,
पुणे

अर्जदाराचे संपुर्ण नांव:-

ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक:-

अर्जातील त्रुटी:-

| अर्जामधील आलेली माहिती | अपेक्षित बदल |
|---|---|
| १. ------------------------------ | १. ------------------------------ |
| २. ------------------------------ | २. ------------------------------ |
| ३. ------------------------------ | ३. ------------------------------ |

(हरकती / त्रुटींचे मुद्दे:- यादीत नांव नसणे, नावातील बदल, जन्मतारखेतील बदल, मार्कातील बदल, आरक्षणातील बदल, इत्यादी).

वरीलप्रमाणे माझ्या अर्जामध्ये त्रुटी आहेत. तरी त्या दुरुस्त करुन द्याव्यात ही विनंती.

(सुचना:- अपेक्षित बदल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मार्गदर्शन केंद्राकडे जमा करणे बंधनकारक आहे.)

दिनांक :- /०७/२०१७ पालकाची सही विद्यार्थ्याची सही

**सूचना :-**

१. सदर अर्ज पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील शाळेतील विद्यार्थी/पालकांने त्यांच्या शाळेतील मुख्याध्यापकांकडे दि ०५ व ०६ जुलै २०१७ (सकाळी ११ ते दु. ४.००) यावेळेत जमा करावा.

२. पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांनी व अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी माहिती पुस्तिकेत दिलेल्या मार्गदर्शन केंद्रांमध्ये दि ०५ व ०६ जुलै २०१७ (सकाळी ११ ते दु. ४.००) यावेळेत जमा करावा.

३. एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या मार्कात बदल असल्यास त्यांनी **शिक्षण उपसंचालक कार्यालय, लाल देवळासमोर, कॅम्प पुणे-१ येथे श्री. जगताप के.जी. यांचेकडे** आवश्यक कागदपत्रासह अर्ज दयावा.

४. वरील प्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक/मार्गदर्शन केंद्रांनी आपल्या लॉग-इन मधून योग्य त्या पुराव्याच्या आधारे सदर दुरुस्त्या दि. ०५ व ०६ जुलै २०१७ सायं. ५.०० वाजेपर्यंत कराव्यात.